**सदरची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांच्या प्राथमिक सरावासाठी आहे.**

**प्रथम सत्र सराव प्रश्नपत्रिका**

**इयत्ता: 11 वी** **विषय: भूगोल**

**वेळ: 2.30 तास**

**एकूण गुण: 50**

---

**सामान्य सूचना:**

1) सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

2) आवश्यक तेथे सुबक आकृत्या व आलेख काढावेत.

3) नकाशाचा वापर योग्य तेथे करावा.

4) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

5) प्रश्नपत्रिकेतील सर्व अंक इंग्रजीत दिलेले आहेत.

___

**XI Geo First Semester Que Paper & Ans**

**प्रश्न 1. वस्तुनिष्ठ प्रश्न (एकूण गुण: 13)**

**प्रश्न 1 A) खालील 'अ', 'ब' आणि 'क' स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून साखळी पूर्ण करा: (4 गुण)**

| अ | ब | क |
|---|---|---|
| 1) आम्ल लाव्हा | 1) चुनखडकाचा प्रदेश | 1) भूछत्र खडक |
| 2) कार्बनिक आम्ल | 2) सिलिकाचे प्रमाण जास्त | 2) U-आकाराची दरी |



Proff Manojj Deshmukh

| | | |
|---|---|---|
| 3) भूजल कार्य | 3) तळाचे व काठांचे अपक्षरण | 3) तीव्र उताराचे शंकू |
| 4) हिमनदीचे खनन कार्य | 4) खडकांवर रासायनिक अभिक्रिया | 4) गुहा व लवणस्तंभ |

---

**प्रश्न 1 B) पुढील विधाने दिलेल्या सूचनेनुसार पूर्ण करा / योग्य क्रम लावा: (3 गुण)**

**1) खालील भूरूपांचा नदीच्या उगमापासून मुखाकडे योग्य क्रम लावा:**

अ) पूरमैदान

ब) घळई

क) त्रिभुज प्रदेश

ड) पंखाकृती मैदान

**2) गोठण-वितळण प्रक्रियेचे टप्पे योग्य क्रमाने लावा:**

अ) खडकांचे तुकडे होणे

ब) खडकांच्या भेगांत पाणी शिरणे

क) पाण्याचे बर्फात रूपांतर होऊन आकारमान वाढणे

ड) भेगा रुंदावणे

**3) खालील हवामान प्रदेशांचा विषुववृत्ताकडून ध्रुवाकडे योग्य क्रम लावा:**

अ) तैगा प्रदेश

ब) विषुववृत्तीय वर्षावने

क) भूमध्यसागरीय हवामान प्रदेश

ड) टुंड्रा प्रदेश

---

**प्रश्न 1 C) योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा: (3 गुण)**



Proff Manojj Deshmukh

**1) वळीची दोन्ही अंगे समान कोनात झुकलेली व आणि तिचे अक्षीय प्रतल उभे असते**

अ) असममित वळी

ब) सममित वळी

क) उलथलेली वळी

ड) आडवी वळी

**2) कोरड्या आणि उष्ण वाळवंटी प्रदेशातील विदारण**

अ) रासायनिक विदारण

ब) जैविक विदारण

क) कायिक विदारण

ड) द्रवीकरण

**3) सागरी लाटांच्या संचयन कार्यामुळे निर्माण होणारे भूरूप**

अ) तरंगघर्षित चबूतरा

ब) सागरी गुहा

क) पुळण

ड) सागरी स्तंभ

---

**प्रश्न 1 D) अचूक सहसंबंध ओळखा (A: विधान, R: कारण): (3 गुण)**

1)

**A:** विषुववृत्तीय प्रदेशात वर्षभर दुपारनंतर मुसळधार पाऊस पडतो.
**R:** या प्रदेशात सूर्यकिरणे लंबरूप पडतात आणि अभिसरण प्रवाह निर्माण होतात.
(अ) केवळ A बरोबर आहे.



Proff Manojj Deshmukh

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे. (ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

2)

**A:** मंद हालचालींमुळे भूकवचाला वळ्या पडतात किंवा विभंग होतो.

**R:** पृथ्वीच्या अंतर्गाभातील ताण आणि दाब या बलांमुळे भूकवचात हालचाली घडतात.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे. (ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

3)

**A:** वाळवंटी प्रदेशात वाऱ्याचे कार्य हे भूजलाच्या कार्यापेक्षा अधिक प्रभावी असते. **R:** वाळवंटी प्रदेशात वनस्पतींचे आच्छादन कमी असते आणि हवा कोरडी असते.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे. (ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

---

**प्रश्न 2) भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही 3): (9 गुण)**

1) पर्वतीय प्रदेशात नद्या 'V' आकाराची दरी आणि 'घळई' या भूरूपांची निर्मिती करतात.

2) रासायनिक विदारण हे आद्र आणि उष्ण हवामानाच्या प्रदेशात अधिक प्रभावी असते.

3) मृत आणि सुप्त ज्वालामुखींच्या मुखाशी विवर सरोवरांची (Crater Lakes) निर्मिती होते.

4) भूमध्यसागरीय हवामान प्रदेशात उन्हाळा कोरडा असतो आणि हिवाळ्यात पाऊस पडतो.



Proff Manojj Deshmukh

5) विषुववृत्तीय वर्षावनांमध्ये जैविक विविधता मुबलक प्रमाणात आढळते.

______________________________________

**XI Geo First Semester Que Paper & Ans**

**s**

**प्रश्न 3) फरक स्पष्ट करा (कोणतेही 3): (9 गुण)**

1) मंद हालचाली आणि शीघ्र हालचाली

2) कायिक विदारण आणि रासायनिक विदारण

3) 'V' आकाराची दरी आणि 'U' आकाराची दरी

4) मोसमी हवामान प्रदेश आणि भूमध्यसागरीय हवामान प्रदेश

5) पूरतट आणि पूरमैदान

---

**प्रश्न 4) जगाच्या नकाशा आराखड्यात खालील घटक योग्य चिन्हांच्या साहाय्याने दर्शवा व सूची तयार करा (कोणतेही 5): (5 गुण)**

1. विषुववृत्त
2. ॲमेझॉन नदी खोऱ्याचा एक मोठा देश/ प्रदेश
3. भूमध्यसागरीय हवामान प्रदेश (स्पेन, इटली)
4. प्रशांत महासागराचे अग्निकंकण क्षेत्र
5. माउंट फुजी जागृत ज्वालामुखी
6. सेंट हेलिंना
7. ऑस्ट्रेलिया



Proff Manojj Deshmukh

---

**प्रश्न 5) टिपा लिहा (कोणत्याही 2): (8 गुण)**

1) खचदरी व गटपर्वत

2) भूजलाच्या द्रावण व संचयन कार्यामुळे निर्माण होणारी 'कार्स्ट भूरूपे'

3) विस्तृत झीजेचे प्रकार

4) तैगा हवामान प्रदेशाची वैशिष्ट्ये

---

**प्रश्न 6 अ) खालील उताऱ्याचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (4 गुण)**

हिंदी महासागराचा भारताच्या मोसमी हवामानावर मोठा प्रभाव पडतो. उन्हाळ्यात भारतीय भूभाग अधिक तापल्यामुळे हिंदी महासागरावरून बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे हवेत आर्द्रता वाढते आणि भारताकडे येणारे नैऋत्य मोसमी वारे आर्द्र बनतात. हे वारे हिंदी महासागरातून मोठ्या प्रमाणात जलवाष्प घेऊन भारतात प्रवेश करतात. त्यामुळे भारतात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. पश्चिम किनाऱ्यावर अरबी समुद्राच्या शाखेमुळे मुसळधार पाऊस पडतो. बंगालच्या उपसागराची शाखाही मोठ्या प्रमाणात आर्द्रता घेऊन भारताच्या पूर्व व ईशान्य भागात पाऊस आणते. हिवाळ्यात हिंदी महासागर तुलनेने उष्ण राहिल्यामुळे समुद्र व भूभागातील तापमानातील फरक निर्माण होतो. या तापमानातील फरकामुळे मोसमी वाऱ्यांच्या दिशेत बदल होतो. त्यामुळे हिंदी महासागर भारतातील मोसमी हवामानाच्या निर्मिती आणि स्वरूपावर महत्त्वाचा प्रभाव टाकतो.

**प्रश्न**

1. भारताच्या मोसमी हवामानावर कोणत्या महासागराचा मोठा प्रभाव पडतो?
2. उन्हाळ्यात हिंदी महासागरावर बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात का होते?
3. नैऋत्य मोसमी वारे भारतात येताना जलवाष्प कोठून घेतात?
4. बंगालच्या उपसागराची शाखा भारताच्या कोणत्या भागात पाऊस आणते?



Proff Manojj Deshmukh

**प्रश्न 6 B) खालीलपैकी कोणत्याही एका घटकाची सुबक आकृती काढून नावे द्या: (2 गुण)**

1 धबधबा व प्रपातगर्ता

2 कातर विभंग

**XI Geo First Semester Que Paper & Ans**

**s**

Proff Manojj Deshmukh